जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

# भाजपला देशात बसलेल्या फटक्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका!

संपादकीय

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. लोकसभेच्या निवडणुकांच्या निकालांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि हरियाणा राज्यांत १५ ऑक्टोबरला निवडणुका होणार आहेत. त्याकडे संपूर्ण देशाचे विशेष लक्ष राहणार आहे. एक म्हणजे लोकसभेमध्ये भाजपला स्वत:चे बहुमत प्राप्त झाले. धर्मांध द्वेषावर आधारलेल्या एका पक्षाला असे बहुमत प्राप्त होणे, ही एक अभूतपूर्व आणि तितकीच धोकादायक अशी राजकीय घटना होती. त्यामध्ये महाराष्ट्रातदेखील भाजप-शिवसेनेला ४८ पैकी ४२ जागा मिळाल्या.

परंतु दोनच दिवसांपूर्वी पाच राज्यांतील विधानसभेच्या रिकाम्या झालेल्या जागांसाठीच्या पोटनिवडणुकांचे निकाल लागले. आणि देशातील जनता धर्मांध द्वेषाच्या ठेकेदारांच्या संपूर्ण प्रभावाखाली तर नाहीच, पण त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याच्याच मनस्थितीत असल्याचा दिलासा मिळाला. ज्या उत्तर प्रदेशमध्ये भाजपने ७३ लोकसभेच्या जागा जिंकल्या, त्यापैकी ११ ठिकाणी भाजपचे आमदार लोकसभेवर निवडून गेल्याने, तेथे आमदारपदासाठी झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये ८ ठिकाणी भाजपला पराभव पत्करावा लागला. याच प्रकारे राजस्थानमध्ये ४ पैकी ३, गुजरातमध्ये ९ पैकी ३ जागांवर भाजपला फटका बसला. गेल्या महिन्यात झालेल्या अशाच पोटनिवडणुकांमध्ये बिहारमध्ये १० पैकी ६, कर्नाटकात ३ पैकी २, मध्य प्रदेशात ३ पैकी १ आणि उत्तराखंडमध्ये ३ पैकी ३ जागांवर भाजपला असाच तडाखा बसला होता.

याचा अर्थ हाच आहे की, ज्या आक्रमकपणे उत्तर प्रदेशमध्ये हिंदू-मुस्लीम दंग्यांची आग लावली, त्यातदेखील जाट समाजाला मुस्लिमांविरोधात भडकाविले, लव्ह जिहादसारख्या समाजाला मध्ययुगात नेणाऱ्या घोषणा केल्या आणि काँग्रेसच्या भीषण भ्रष्टाचाराचे, महागाईचे भांडवल करून निवडणुका जिंकल्या, सर्व काही तात्काळ बदलून दाखवू अशा वल्गना केल्या, त्या सर्वांबाबतच भोपळा फुटण्यास आता सुरुवात झाली आहे. लोकांनी त्याबाबत शंका घेण्यास सुरुवात केली आहे. संपूर्ण उत्तर भारत आपल्या हातात असल्याच्या थाटात, भाजपचे खासदार अवैद्यनाथ आपल्या मनातील विखार उधळत निघाले होते. त्याला अटकाव होऊ शकतो, असा दिलासा या निकालांतून मिळाला आहे. सरकारच्या स्थापनेनंतर सर्व वातावरण खरे तर सत्ताधाऱ्यांच्या आत्यंतिक उद्दामपणाने आणि विरोधकांच्या पराभवाच्या भावनेने भरलेले असताना, केवळ चार महिन्यांतच ही नामुष्की पदरात घेण्याची वेळ भाजपवर आली आहे.

महाराष्ट्रात गेली १५ वर्षे राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडीचे राज्य आहे. या काळात महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे जे उत्तुंग मनोरे उभे झाले, त्याला इतिहासात तोड नाही. संपूर्ण राज्य ही आपली खाजगी जहागिर असून, येथील सरकारी निर्णय आणि खजिना हे आपल्या टोळीतील दलाल-कंत्राटदारांच्या सोयीनेच वापरले गेले पाहिजेत, हे मापदंड राज्यात या सरकारने निर्माण केले. राज्याचे ४ मुख्यमंत्री, ३ मंत्री आणि कित्येक उच्चपदस्थ सनदी अधिकारी यांनी मिळून, मुंबईमध्ये आदर्श सोसायटीसारखे बड्या धनिकांसाठी गृहप्रकल्प उभे करून भ्रष्टाचाराचे उत्तुंग मनोरेच उभे केले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच त्यांचे सहकारी सुनिल तटकरे यांनी

सिंचनामधून हजारो कोटींचे महासागर रिचविले. कृपाशंकर सिंह या गृहमंत्र्यांनीच स्वत: हजारो कोटींची माया जमविली.

राष्ट्रवादीचे टोलमंत्री छगन भुजबळ, गुलाबराव देवकर, विजयकुमार गावीत, बबनराव पाचपुते यांनीदेखील आपल्या कुवतीप्रमाणे याच रांगेत आपला क्रमांक राखला. पैकी गावीत आणि पाचपुते हे आता भाजपच्या वळचणीला जाऊन भविष्याची बेगमी करण्यामध्ये मग्न आहेत. भाजपने त्यांच्या भ्रष्टाचाराच्या योजनांचे आर्किटेक्ट म्हणून या गणंगांना प्रवेश दिलेला आहे. देवकरांना तर न्यायालयाने अटक करण्याचे आदेश दिल्यानंतरदेखील ते मंत्रीपदावरच होते. या भ्रष्टाचाराच्या चौकशा करणाऱ्या अधिकृत उच्चस्तरीय समित्यांनी दोषींकडे स्पष्ट निर्देश करणारे अहवाल दिले. ते सर्व या आघाडी सरकारने लाथेने उडवून मंत्रालयाच्या मातीत कुजविले. भ्रष्टाचाराच्या विरोधातील वातावरणाची दखल घेऊन जे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण येथे आले, त्यांचे खरे काम या सर्वांवर पांघरूण घालण्याचेच होते, हे आता स्पष्ट झाले.

गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य, सिंचन, वीजनिर्मिती, रोजगार, समाजकल्याण या प्रत्येक बाबतीत भीषण पिछेहाट झालेली आहे. त्याचा तपशील 'जीवनमार्ग'मध्ये यापूर्वी आलेला आहे व येत राहील. दलित-आदिवासी-अल्पसंख्याक-स्त्रियांवरील अत्याचारांत आणि मुख्य म्हणजे त्याच्या निर्लज्ज समर्थनात मोठीच वाढ झालेली आहे. या आणि एकूणच कोणत्याही गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा होण्याचे दाखल झालेल्या खटल्यांशी असणारे प्रमाण १० टक्क्यांवर आलेले आहे.

तर दुसरीकडे याला पर्याय म्हणून दावे आणि कावे करणारे भाजप-शिवसेना यांनी १९९५-१९९९ या काळात त्यांचे चारित्र्य काय आहे, हे दाखवून दिलेले आहेच. त्यांचे थोर भ्रष्ट मंत्री बबनराव घोलप, सुरेश जैन यांना न्यायालयाने स्पष्ट दोषी ठरवूनदेखील त्यांच्या बाजूने उभे राहण्याचा, त्यांना निवडणुकीची तिकिटे देण्याचा उर्मटपणा आणि त्यातील पैशाबाबतचा मिंधेपणा या भाजप-शिवसेनेच्या सर्व नेत्यांमध्ये कसा ठासून भरला आहे हे महाराष्ट्राने पाहिले आहे. मुंबई-ठाणे महानगरपालिकेच्या भ्रष्ट कारभारातून शिवसेनेच्या अब्रूचे धिंडवडे उडताना आपण पाहिलेले आहेत.

दिल्लीतील विजयामुळे माजोरीपणाने वागणाऱ्या भाजप-शिवसेनेची राजकीय संस्कृती त्यांच्या आपापसांतील जागावाटपाच्या चर्चेतून आणि मुख्यमंत्रीपदाच्या निर्लज्ज स्पर्धेतून स्पष्ट झाली आहे. ज्यांच्या भ्रष्टाचाराबद्दल विधानसभेत प्रखरपणे भाजप-शिवसेनेने आरोप केले, त्यांनाच सरसकटपणे भाजपमध्ये प्रवेश देण्याचा राजकीय कोडगेपणा-निर्लज्जपणा यांनी ही युतीही खचाखच भरलेली आहे. केवळ सत्तेचा वास येताच, त्यांची मुळची वाकडी चाल किती बेशरम होऊ शकते याचे दर्शन महाराष्ट्र घेतो आहे. त्यांच्याकडे महाराष्ट्राला नवी दिशा तर सोडाच, पण निदान जनतेला दिलासा देणारादेखील कार्यक्रम नाही. चारित्र्य तर त्याहून नाही. ते आघाडीला पर्याय कधीच नव्हते. होऊ शकणार नाहीत.

मनसे या राज ठाकरेंच्या खाजगी कंपनीला दिवाळखोरीची घरघर लागली आहे. माजोरी शैलीत माजोरी चेहऱ्याने बापकमाईच्या पैशातून राजकारण करणारे राज ठाकरे आता पूर्णत: उघडे पडले असून त्यांचे राजकीय अस्तित्व या निवडणुकीनंतर संपलेले असेल, यात शंका नाही.

अशा परिस्थितीत कामगार-शेतकरी-शेतमजूर-दलित-आदिवासा-अल्पसंख्याक-शहरी-ग्रामीण-गरीब-बेघर-महिला-युवक-विद्यार्थी यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या डाव्या लोकशाही शक्तींना निवडणुकांना सामारे जायचे आहे. माकप, भाकप, शेकाप, जनता दल (सेक्युलर), रिपाइं (सेक्युलर), रिपाइं (खोब्रागडे-आरके) यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीत जागावाटपाची चर्चा जवळपास पूर्ण होत आलेली आहे. भारिप-बहुजन महासंघ, दोन्ही लाल निशाण पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष यांच्या महाराष्ट्र लोकशाही आघाडीसोबत समितीची जागावाटपाची चर्चा सुरू आहे आणि ती सामोपचाराने पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रात शिवसेना-भाजप महायुती, काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी आणि मनसे यांना जोरदार टक्कर देऊन या सर्व डाव्या, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष शक्तींची एक चांगली ताकद नवीन विधानसभेत दिसेल याचा आम्हाला विश्वास आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या निवडणुकीत पालघर, ठाणे, नाशिक, सोलापूर, मुंबई, अहमदनगर, नंदुरबार, कोल्हापूर, चंद्रपूर, नांदेड, परभणी, बीड आणि जालना या १३ जिल्ह्यांत २० जागा लढवित आहे. हे सर्व मतदारसंघ व त्यातील पक्षाचे उमेदवार यांची यादी 'जीवनमार्ग'च्या पुढील अंकात प्रसिद्ध होईल. पक्ष लढवित असलेल्या प्रत्येक जागेवर लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी आणि त्यानंतरही पक्ष व जनसंघटनांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर जोरदार लढे झाले आहेत. त्यात हजारो लोक उत्साहाने सहभागी झाले आहेत. येणाऱ्या तीन आठवड्यांत पक्षाचे हजारो कार्यकर्ते या निवडणूक मोहिमेत अधिकाधिक उमेदवारांच्या विजयासाठी तन-मन-धन पणाला लावतील हा आमचा दृढ विश्वास आहे.

□□□

# पक्षाच्या पॉलिटब्यूरोची निवेदने

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोची नवी दिल्ली येथे १० ते १२ सप्टेंबर, २०१४ दरम्यान बैठक झाली. त्या बैठकीनंतर पॉलिटब्यूरोने खालील निवेदन प्रसृत केले आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये आलेल्या भयानक महापुराविषयी पॉलिटब्यूरोने चिंता व्यक्त केली आहे. या महापुरामुळे शेकडो लोकांना प्राण गमावावे लागले, मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आणि बेघर होऊन लाखोंना स्थलांतर करावे लागले आहे.

पूरग्रस्तांसाठी खूप काही करावे लागणार आहे. लष्कर, निमलष्कराची दले अहोरात्र मदत कार्य करत आहेत. ही परिस्थिती हाताळायला राज्याचे प्रशासन कमी पडत आहे. मदत कार्य सुरू झाल्यानंतरही अजून हजारो लोक पुराच्या पाण्यात अडकून पडलेले आहेत, अन्न व जीवनावश्यक वस्तूंचा प्रचंड तुटवडा आहे, दळणवळण तुटलेले आहे. केंद्र शासनाने आपल्या विविध खात्यांमार्फत मदत कार्याची गती आणि व्याप्ती वाढवणे अतिशय निकडीचे आहे.

पक्षाने आधीच आपल्या सर्व शाखांना मदत कार्य पुनर्वसन करण्यासाठी निधी जमा करण्याचे आवाहन केले आहे. पॉलिटब्यूरो त्याचा पुनरुच्चार करत आहे.

## मोदी सरकारचे निर्णय

योजना आयोग गुंडाळण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयावर पॉलिट ब्यूरोने कडक टीका केली. बाजारपेठेवर आधारित अर्थव्यवस्थेत नियोजनाला स्थान नाही, या नव-उदार दृष्टीकोनाशी सुसंगत असाच हा निर्णय आहे. नियोजन आयोग बरखास्त करण्यातून आता अर्थव्यवस्थेवर वित्त-भांडवल आणि कार्पोरेट नफेखोरांनी पूर्ण नियंत्रण मिळवल्याचे दिसून येते.

कोल इंडिया, NHPC आणि ONGCच्या शेअर्सची मोठ्या संख्येने निर्गुंतवणूक करायच्या सरकारच्या निर्णयावर पॉलिट ब्यूरोने तीव्र टीका केली. हे शेअर्स विकून सरकार ४४,००० कोटी रुपये गोळा करू पहात आहे. आजवरील ही सर्वात मोठी निर्गुंतवणूक आहे. अंदाजपत्रकीय तूट भरून काढण्यासाठी मोदी सरकार ही निर्गुंतवणूक करत आहेच, पण हा निर्णय सार्वजनिक क्षेत्राच्या विरोधात असलेली सरकारची वैचारिक बांधिलकी पूर्ण करणारादेखील आहे.

सार्वजनिक क्षेत्रावरील या हल्ल्याला एकजुटीने विरोध करायची हाक पॉलिट ब्यूरो सर्व लोकशाहीवादी शक्तींना देत आहे.

## आदिवासींचा जमिनीवरील हक्क

घटना आणि कायद्याने आदिवासींना दिलेले हक्क काढून घेण्याच्या दिशेने सरकारने उचललेल्या पावलांचा पॉलिट ब्यूरो निषेध करतो. भूमी अधिग्रहण पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कायदा, वनाधिकार कायदा आणि PESAA या कायद्यातील तरतुदींमुळे आदिवासींना कार्पोरेट कंपन्यांनी जमिनी हडप करण्यापासून काही संरक्षण पुरवले आहे. उदाहरणार्थ, आदिवासींच्या ग्रामसभेच्या संमतीविना पाचव्या परिशिष्टात समाविष्ट होणाऱ्या आदिवासींच्या जमिनीवर कसलेही प्रकल्प राबवता येत नाहीत. वेदांत प्रकरणात आदिवासींचा हा हक्क सर्वोच्च न्यायालयाने उचलून धरला आहे.

मोदी सरकारला हा हक्क आदिवासींच्या हातून काढून घ्यायचा आहे. ते करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी लागेल. त्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी सरकार या कायद्याच्या अंतर्गत असलेले नियम बेकायदेशीरपणे बदलू पहात आहे. युपीए सरकारने आधीच काही प्रकल्पांसाठी आदिवासींचे हक्क काही प्रमाणात काढून घेतलेले आहेत. हे धडधडीत आदिवासीविरोधी पाऊल आणखी पुढे नेण्याचा प्रयत्न मोदी सरकार करत आहे.

एवढेच नव्हे, पर्यावरण मंत्रालयापुढे विचारार्थ असलेल्या ३२५ पैकी २४० प्रकल्पांना या मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. कोळसा, खाणी, वीजनिर्मिती इत्यादी प्रकल्पांसाठी ७,१२२ हेक्टर जमीन हस्तांतरीत केली जात आहे. यातदेखील आदिवासींच्या हक्काला नख लावले जात आहे.

आदिवासींच्या या आणि इतर समस्यांवर आदिवासी संघटनांना सोबत घेऊन माकप आदिवासींच्या हक्कांच्या रक्षणार्थ सामुदायिक लढे उभे करील, अशी ग्वाही देत आहे.

## जमातवादी मोहीम

उत्तर प्रदेशात भाजप-रा.स्व. संघाने चालवलेल्या जमातवादी मोहिमेचा पॉलिट ब्यूरोने कडक शब्दात निषेध केला. धार्मिक तणाव आणि ध्रुवीकरण करण्याच्या उद्देशाने 'लव्ह जिहाद' या तद्दन खोट्या प्रश्नाचा भारतीय जनता पक्ष आणि त्याच्या संघटना वापर करत आहेत. उत्तर प्रदेशातील पोटनिवडणुकीत धार्मिक उन्माद भडकावण्यासाठी भाजप खासदार आदित्यनाथाचा वापर त्यांचा पक्ष करत आहे.

सर्व भारतीयांना हिंदू म्हटले पाहिजे आणि हिंदुत्व हीच हिंदूंची अस्मिता आहे. असे निवेदन रा.स्व. संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केले आहे. त्या पार्श्वभूमीवर वरील धार्मिक उन्माद भडकावण्याच्या प्रयत्नांचा उद्देश ध्यानात घेतला पाहिजे.

धार्मिक विद्वेष पसरवणारी वक्तव्ये करून धार्मिक तणाव वाढवणाऱ्यांविरुद्ध उत्तर प्रदेश सरकारने खंबीर पावले उचलली पाहिजेत. निवडणूक आयोगाने निवडणूक प्रचारात आदित्यनाथांना भाषणे करण्यास बंदी घालणे आवश्यक होते. केवळ शासनाला त्यांच्यावर एफआयआर दाखल करायचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

## चिटफंड आणि तृणमूल यांची साखळी

शारदा चिटफंड घोटाळ्याची चौकशी करत असताना सीबीआयला तृणमूल काँग्रेस या घोटाळ्यात सहभागी असल्याचे दिसून आले आहे. तृणमूल काँग्रेसचे नेतृत्व आणि शारदा चिटफंडचे मालक यांचे घनिष्ट संबंध असल्याचे उघड झाले आहे. या घोटाळ्याशी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसचे इतर नेते संबंधित असल्याचे वरचेवर प्रकाशात येऊ लागले आहे. गुन्हेगारांना संरक्षण देऊन तपासात अडथळे निर्माण करण्याचे अश्लाघ्य प्रयत्न सरकार करत आहे. या गुन्ह्याच्या साखळीत जे जे गुंतलेले असतील त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने चाललेल्या सीबीआय तपासात कसलेही अडथळे येता कामा नयेत. दरम्यानच्या काळात केंद्रीय संस्थांनी हस्तक्षेप करून शारदा ग्रुपची मालमत्ता आणि संपत्ती जप्त करून त्याचा वापर या घोटाळ्यात बळी पडलेल्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी केला पाहिजे. या नुकसान भरपाईसाठी शासकीय निधीचा वापर बिलकुल होता कामा नये.

## राजकीय आढावा

पक्ष घेत आलेल्या राजकीय डावपेचांचा सखोल आढावा पॉलिट ब्यूरोने घेतला. केंद्रीय समितीच्या येत्या बैठकीत या आढाव्याचा अहवाल

सादर करण्यात येईल. येत्या वर्षी होत असलेल्या पक्ष काँग्रेससमोर ठेवायच्या राजकीय ठरावाच्या मसुद्याची तयारी करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे.

## पक्ष काँग्रेस

पक्षाची २१वी काँग्रेस १४ ते १९ एप्रिल २०१५ च्या दरम्यान विशाखापट्टणम येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## जम्मू आणि काश्मीर पूरग्रस्त निधी

जम्मू आणि काश्मीरमध्ये नुकत्याच आलेल्या अभूतपूर्व पूरामुळे नुकसान झालेल्यांच्या मदत आणि पुनर्वसनासाठी लोकसभेतील पक्षाच्या सर्व खासदारांनी आपल्या खासदार निधीतून ५० लाख रुपये द्यावेत असा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घेतला आहे. खासदार निधीच्या नियमानुसार राष्ट्रीय आपत्तीच्या घटनात खासदार ठराविक रक्कम अशा कामासाठी देऊ शकतो.

लोकसभेतील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या खासदारांनी एकूण दहा कोटी रुपयांचा निधी जम्मू आणि काश्मीरमधील या मदत आणि पुनर्वसन कामाला दिला आहे.

# त्रिपुरातील पोटनिवडणुकीत डाव्या आघाडीचा विजय

त्रिपुरात ३९-मानू (अनूसूचित जमाती) या मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत डावी आघाडी पुरस्कृत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार प्रभात चौधरी हे १६,००० मतांच्या प्रचंड फरकाने निवडून आले आहेत. त्रिपुरातील विधानसभेच्या निवडणुक इतिहासात हे मताधिक्य सर्वात जास्त आहे. फक्त काँग्रेस पक्षाचा उमेदवार सोडला तर बाकी सर्व उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. काँग्रेसच्या उमेदवाराची अनामत रक्कमही थोडक्यात बचावली आहे. या मतदारसंघातील आधीचे आमदार जितेंद्र चौधरी यांची लोकसभेवर निवड झाल्याने ही निवडणुक घेण्यात आली होती. निकाल खालीलप्रमाणे,

| | |
|---|---|
| **एकूण मतदार** | **३८,३४३** |
| **मतदान** | **३४, ०३१** |
| **एकूण वैध मतदान** | **३३, ६५७** |
| **प्रभात चौधरी, सीपीआय(एम)** | **२१, ७५९ विजयी** |
| **मोंगलाफ्रू मोग, आयएनसी** | **५,७८८** |
| **मिथुंन्जॉय त्रिपुरा, आयपीएफटी** | **३,०१८** |
| **निर्मलकुमार त्रिपुरा, बीजेपी** | **१,५५०** |
| **अन्गाथाई मोग, टीएमसी** | **१,११०** |
| **किर्तीमोहन त्रिपुरा, आयएनपीटी** | **४३२** |

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ६३.९ टक्के मते मिळाली. जी या मतदारसंघात गेल्या २०१३च्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांपेक्षा ५.८ टक्क्यांनी जास्त आहे. या निकालावरून हे च स्पष्ट होते की, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या मतदारसंघात आपल्या पाठींब्यात वाढ केलेली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या त्रिपुरा राज्य सचिवमंडळाने आपल्या निवेदनात पक्षाच्या उमेदवाराला मोठ्या फरकाच्या निर्णायक मतांनी विजयी केल्याबद्दल मतदारांचे अभिनंदन केले आहे. या विजयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना राज्य सचिवमंडळाने हेही नमूद केले आहे की, हा विजय म्हणजे काही राजकीय घटकांनी राज्याला तथाकथित आदिवासी दर्जा देण्याची संकुचित प्रादेशिक मागणी करीत राज्यातील स्थिती अस्थिर करण्याच्या प्रयत्नांना दिलेला नकार आहे. या निवडणुकीत डाव्यांच्या विरोधात असणाऱ्या प्रसारमाध्यमातील एका विभागाने पक्षविरोधी आणि उमेदवारविरोधी जी खोटी, चुकीची व बदनामीची माहिती पसरवण्याची मोहीम उभारली होती. त्या मोहिमेला या प्रचंड विजयाने सडेतोड उत्तर देत उलटविले आहे.

□□□

# जालना : शेतमजूर महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

शेतमजूर महिलांसाठी विशेष कल्याणकारी मंडळ स्थापन करा व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियनच्या वतीने १२ ऑगस्ट २०१४ रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर शेकडो शेतमजूर महिलांचा आक्रमक मोर्चा काढण्यात आला.

ग्रामीण शेतमजूर महिलांची विविध पातळीवर परवड होत आहे. पाऊस कमी झाल्याने दुष्काळ सदृश्य परिस्थितीमध्ये आपली व कुटुंबाची जिविका चालवणे त्यांना अवघड झाले आहे. मनरेगाची कामे महिलांना पेलतील अशी काढली जात नाहीत. विधवा, परित्यक्ता तसेच ज्येष्ठ महिलांच्या वाट्याला कुचंबनाच येत असून त्या उपेक्षित जीवन जगत आहेत. मजुरांना उत्पन्नाचे साधन नसल्याने ग्रामीण भागातील श्रीमंतवर्गाने विविध पातळीवर गैरफायदा घेत त्यांचे शोषण आरंभले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, विविध सामाजिक-शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा लाभ कष्टकऱ्यांना मिळवून द्या, शेतमजूर महिलांसाठी विशेष कल्याणकारी मंडळ स्थापन करा. विधवा-परित्यक्ता व वयोवृद्ध महिलांना मासिक रु. ३,००० अनुदान सुरू करा, जालना जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून रोहयो/मनरेगाची कामे सुरू करा, पिण्याचे पाणी व जनावरांना चारा उपलब्ध करून द्या, सर्व जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा स्वस्त धान्य दुकानांमार्फत करा, महिलांवरील अन्याय-अत्याचाराला आळा घाला, या व इतर महत्वपूर्ण मागण्यांचे निवेदन यावेळी देण्यात आले.

मोर्चाचे नेतृत्व शेतमजूर युनियनचे राज्य सचिव बळीराम भुंबे, राज्य कमिटी सदस्य सय्यद रज्जाक, जनवादी महिला संघटनेच्या जिल्हा निमंत्रक सरिता शर्मा, शेतमजूर युनियनचे जिल्हा अध्यक्ष नंदकिशोर प्रधान, जिल्हा सचिव मारोती खंदारे, सुदाम शिंदे, विनोद गोविंदवार यांनी केले. यावेळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव अण्णा सावंत, मधुकर मोकळे, प्रा. सुनंदा तिडके इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

मोर्चा यशस्वी करण्यासाठी शेतमजूर युनियनचे विजय म्हस्के, सोजरबाई साळवे, अंकुश मोहिते, प्रल्हाद गाडेकर, दशरथ सवणे, अर्जुन दवंडे, गणेश जाधव, पद्माबाई जाधव, एस.एफ.आय.चे जिल्हा अध्यक्ष अनिल मिसाळ व जिल्हा सचिव मंजुश्री कबाडे यांनी परिश्रम घेतले.

**– मारोती खंदारे**

## पंतप्रधानांची जपान भेट

# ‘गोबेल्स’ची कार्यप्रणाली - पुन्हा एकदा!

**सीताराम येचुरी**

आरएसएस आणि भाजप ‘काळाच्या कसोटीला उतरलेल्या त्यांच्या कार्यप्रणालीचा पुन्हा एकदा आश्रय घेत असल्याचे दिसून येते आहे.’ ही कार्यप्रणाली जोसेफ गोबेल्स नावाच्या, हिटलरच्या फॅसिस्ट प्रचार-मंत्र्याने मांडलेल्या एका सूत्रावर (Dictum) आधारलेली आहे. दडपशाही, लष्करी आक्रमण यांसारख्या अत्यंत भयानक आणि गर्हणीय कारवाया करून संपूर्ण जगाला अखेरीस विनाशकारी दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटून देणाऱ्या फॅसिस्ट शक्ती जेव्हा अधिकाधिक प्रबळ होत होत्या, त्यासुमारास गोबेल्सने सुरू केलेल्या फॅसिस्ट प्रचाराचे एक सूत्र होते–‘एखादे मोठे असत्य, पुन्हा पुन्हा सांगा, जेणेकरून लोक असत्य, सत्य आहे असे मानू लागतील.’ प्रचाराची ही अशी फसवी आणि धोका देणारी कार्यप्रणाली, आज मोदी सरकार आणि त्यांच्या सोबत, चिथावणीखोर, हिंसक आणि धर्मांध मुद्दे उठविणारा आरएसएस आणि त्याचे अनेक उपांगी दल, यांचा मुख्य आधार झाली आहे.

यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये, एकूण मतांच्या फक्त ३१ टक्के मते मिळूनही भाजपला लोकसभेत बहुमत मिळाले. त्यानंतर लाल किल्ल्याच्या तटावरून पंतप्रधान मोदींनी देशाला उद्देशून केलेले त्यांचे पहिले भाषण आठवा. निवडणूक प्रचारमोहिमेतील मुख्य मुद्द्यांपैकी एकाही मुद्याचा उल्लेख आपल्या भाषणात करण्याचे मोदींनी जाणूनबुजून टाळले. महागाई आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला जाईल, तसेच जनतेचे जीवनमान सुधारण्याचेही प्रयत्न होतील, या त्यांच्याच आश्वासनांचा उल्लेख कुठेही नव्हता. भ्रष्टाचारावर नियंत्रण सोडा, पण निदान भ्रष्टाचाराच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी सरकार कोणती पाऊले उचलील याबद्दल पंतप्रधान काहीही बोलले नाहीत. ‘चांगले प्रशासन’ या त्यांच्या घोषणेबद्दल एकही शब्द नाही. आणि अर्थातच त्यांच्या निवडणूक प्रचाराचा मुख्य आधारस्तंभ असलेले, ‘अच्छे दिन आनेवाले आहे’ हे त्यांचे आवडते घोषवाक्य’ तर नव्हतेच नव्हते. लाल किल्ल्यावरचे पंतप्रधानांचे भाषण एक निरर्थक, अलंकारिक वक्तृत्व होते. ‘गर्दी घोळक्याला, जमावाला उत्तेजित करणारे!’

भारत सरकारचे प्रमुख म्हणून नरेंद्र मोदींनी अखेरीस (मोठ्या उत्साहाने आधी जाहीर केलेली कार्ययोजना पुढे ढकलून) जपानला भेट दिली. पंतप्रधान या नात्याने त्यांच्या कारकिर्दीच्या पहिल्या १०० दिवसांमध्ये आपण वस्तुत: चमत्कार केल्याची मेघगर्जना त्यांनी या भेटीत केली. राष्ट्रीय पातळीवरील राजकारण त्यांना नवखे होते, तसेच दिल्लीला स्थानांत्तर करण्याविषयी ते साशंक होते, मनात धाकधूक होते, तरीसुद्धा आधीच्या सरकारच्या कार्यकाळात भारत ज्या ‘पक्षाघाताने’ (Paralysis) बाधित झाला होता, ती अवस्था आता, १०० दिवसांच्या अल्पावधीत त्यांनी उलटी फिरविली आहे, असेही ते म्हणाले, आपल्या या दाव्याचे समर्थन करताना पंतप्रधानांनी काही दिवसांपूर्वी अर्थमंत्र्यानी मोठ्या तोऱ्यात जाहीर केलेली संख्यात्मक माहिती वाचून दाखविली.

नरेंद्र मोदींच्या जपानभेटीविषयी भारतीय कॉर्पोरेट्नी आणि कॉर्पोरेट माध्यमांनी प्रचंड उल्हासोन्माद निर्माण केला होता. आणि अजूनही नरेंद्र मोदींचे हे चाहते-'cheerleaders' जोडीने त्यांच्या यशस्वी जपान भेटीचे गुणगान गात आहेत. जणू काही मोदींच्या जपान भेटीपूर्वी भारताच्या दुसऱ्या कोणत्याही पंतप्रधानांनी किंवा भारत सरकारच्या दुसऱ्या कोणत्याही प्रमुखांनी परदेशाला दिलेली भेट इतकी यशस्वी कधीच झाली नव्हती! हे म्हणजे फ्रान्सचा राजा, १५वा चार्ल्स यांच्यासारखे झाले. त्याला वाटायचे, तो राजा होण्यापूर्वी फ्रान्सला इतिहास नव्हताच! एवढेच नव्हे तर त्याने असेही म्हटले होते. ‘माझ्यानंतर प्रलय निश्चित!’

देशाचा ‘सकल घरेलु उत्पन्न निर्देशांक’, (जीडीपी इंडेक्स) जो गेल्या दोन वर्षांमध्ये सरासरी ५ टक्क्यापेक्षा कमी होता, तो वाढून २०१४-१५ या अंदाजपत्रकीय वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये म्हणजे एप्रिल-मे-जूनमध्ये ५.७ टक्के झाला आहे; केवळ या आधारावर भारताला दुर्बल अवस्थेमधून आता आपण परिणामकारकरित्या बाहेर काढण्याचा दावा मोदींनी जपानमध्ये केला. या ठिकाणी लक्षात ठेवायला हवे की, अशा टक्केवारींना ‘चटकन् केलेले अंदाज’ (Quick Estimates) म्हणतात. नंतर जेव्हा अंतिम आकडे प्राप्त होतील तेव्हा आर्थिक विकासदराचा खरा आकडा फार वेगळा असू शकतो. तरीही एक महत्वाची बाब विसरून चालणार नाही, ती ही की, २०१४-१५च्या एप्रिल-मे-जून या तीन महिन्यांपैकी मे महिन्याच्या अखेरीस २६ मे रोजी नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. याचा अर्थ देशाला तथाकथित ‘पक्षाघाता’मधून बाहेर काढण्याचा चमत्कार करून दाखविण्यासाठी मोदींना जूनचा एक महिनाच मिळाला होता, आणि विशेष म्हणजे तो त्यांना पुरला सुद्धा! खरोखर भारतीय कॉर्पोरेट्सना मोदींच्या रुपाने ‘मसिहा’ नव्हे तर एका जादूगाराचा शोध लागलाय! अलिकडच्या ‘पिपल्स डेमॉक्रसी’च्या लेखामध्ये प्रभात पटनाईक यांनी मोदींच्या या दाव्याच्या चिंध्या केल्या आहेत आणि जून महिन्यामध्येच देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांमध्ये विकासदर सर्वसामान्यत: घसरल्याचे दाखवून दिले आहे. लवकरच आपल्याला सापडलेला ‘जादूगार’ दुसरातिसरा कोणी नसून खुद्द ‘आधुनिक गोबेल्स’च आहे, हे कॉर्पोरेट्स माध्यमांनाही कळून चुकले आहे आणि त्यांची चांगलीच निराशा होईल.

सध्या विचारात असलेल्या एप्रिल-मे-जून (२०१४-१५) या तीन महिन्यांपैकी पहिले दोन महिने युपीए-२ चे सरकार होते. या सरकारने तयार केलेल्या परंतु आताच्या अर्थमंत्र्यानी संसदेत मांडलेल्या ‘इकॉनॉमिक सर्व्हे (२०१३-१४) मध्ये २०१४-१५ या चालू वर्षाच्या आर्थिक विकल्पांविषयी महत्वाचे संकेत सूचित करण्यात आले आहेत. त्यात सुरुवातीला म्हटले आहे ‘सकल घरेलु उत्पन्न निर्देशांकांच्या गेल्या दोन वर्षांमध्ये दिसून आलेल्या ५ टक्क्यापेक्षा कमी वाढीवर मात करून पुढे जाण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्था २०१४-१५ मध्ये पूर्णपणे तयार आहे’. या सर्वेक्षणात पुढे असेही म्हटले आहे की, ‘राष्ट्रीय स्तरावरील अर्थव्यवस्थेच्या

स्थायीकरणाकडे पाहिले तर, २०११-१२ आणि २०१२-२०१३ या २०१३-१४ पूर्वीच्या दोन वर्षी चालू खात्यातील तुटीमध्ये (CAD) जी काळजी करण्याजोगी वाढ झाली होती, त्या वाढीचे प्रमाण २०१३-१४ साली आयात-निर्यात क्षेत्रातील लक्षणीय प्रगतीमुळे आटोपशीर झाले होते. देशाच्या अर्थव्यवस्थेला तारूण नेणारे, असे हे २०१३-१४ सालचे वैशिष्ट्य होते. तसेच दुसरे हे की, २०१३-१४ या अंदाजपत्रकीय वर्षामध्ये, सरकारी वसूली आणि खर्च यांच्यातील वार्षिक तूट देखील सकल घरेलु उत्पन्नाच्या प्रमाणात कमी झाली आहे.' 'इकॉनॉमिक सर्व्हे'च्या पहिल्या विभागाच्या शेवटी म्हटले आहे. '२०१४-१५'मध्ये आणि त्यानंतरही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी आणखी चांगला विकास संभवनीय आहे.

युपीए-२ च्या नवउदारवादी धोरणांच्या परिणामी निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांमुळे देशाच्या 'आम आदमी'च्या हालअपेष्टांना पारावार उरला नव्हता आणि त्यामुळे सामान्य जनतेच्या असंतोषाचा फायदा थेट भाजपला निवडणुकांमध्ये सरशी मिळविण्यात झाला हे खरे! तथापि मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर अर्थव्यवस्थेमध्ये सुरुवातीला थोडीफार सुधारणा झाल्याची जी झलक दिसून आली ती 'मोदी मॅजिक'मुळे असा गडगडाट करणे शुद्ध मूर्खपणाचे होय. या सरकारने दिलेले सुरुवातीचे संकेत, त्या अनुषंगाने खाजगीकरणाविषयीची सरकारची विधेयके. तसेच भारतीय बाजारपेठेमधून आणि स्त्रोतांमधून अधिकाधिक नफेखोरी करता यावी म्हणून विदेशी भांडवलाचा देशात आणखी शिरकाव - या अलिकडच्या घडामोडी पाहिल्या तर हे मोदी सरकार नवउदारवादी सुधारणांचा अजेंडा अधिक आक्रमकपणे पुढे रेटीत असल्याचे स्पष्ट होते. हाच अजेंडा, पंतप्रधान मोदींनी, आणखी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी जपानमध्ये दिलेल्या आश्वासनांचा मूळ गाभा आहे.

जपानकडून २० लाख कोटीपेक्षा अधिक रक्कमेची गुंतवणूक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यापूर्वी देखील अनेक अशा प्रकारची आश्वासनेच नव्हे तर आणखी मोठ्या रक्कमेच्या निवेदनपत्रिकांवर (मेमोरॅन्डा ऑफ अन्डरस्टॅंडिंग-MoU) दोन्ही देशांतर्फे सह्या झाल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात काहीही ठोस घडलेले नाही. समजा, यदाकदाचित जपानने दिलेले वचन पाळून, गुंतवणूक केलीच तर त्याद्वारे आपल्या देशामध्ये नवीन कारखाने उभे राहतील का?, आपला रोजगार वाढेल का? म्हणजे थोडक्यात आपल्या देशाच्या उत्पादन क्षमतेची पातळी उंचावण्यास मदत होईल का? आपल्या देशात आजतागायत नसलेले अद्ययावत तंत्रज्ञान इथे आणले जाईल का? हे देखील पहावे लागेल... परंतु याऐवजी आपली समृद्ध नैसर्गिक संसाधने, कच्चा माल आणि स्वस्त कामगारवेतन दर हे लाभ लाटून जपानने स्वत:साठी अधिकतम नफे मिळवून देणारी, परंतु भारतासाठी प्रत्यक्षात ठोस मोबदला न देणारी, दुसऱ्या कोणत्याही प्रकारची गुंतवणूक केली तर त्यातून भारताचे काहीही भले होणार नाही, उलट जास्त हानिच होईल. गुंतवणुकीचा हा दुसरा निकष, जपानच्या दृष्टीने सोईस्कर ठरू शकतो, याचे कारण असे की, अनेक वर्षे 'बाजारातील मंदी'मुळे ग्रासलेला जपान, आर्थिक मंदीच्या संकटातून बाहेर पडत असल्याची चिन्हे आता कुठे दिसू लागली आहेत आणि म्हणून ही आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी जपान अधिकाधिक नफा मिळविण्याच्या मार्गाचा आश्रय घेणे पसंत करत राहील.

थोडक्यात जनतेला 'अच्छे दिन' मोदी सरकार देणार नाही. जनतेने ते स्वत:च मिळवायला हवेत. आणि त्यासाठी वाढती धर्मांधता आणि नवउदारवादी आर्थिक सुधारणांचा झपाटा, यांच्या, आज दिसून येणाऱ्या, दाहक मिश्रणांच्या विरोधात जनतेने निरंतरपणे संघर्ष करायला हवा. एक होऊन आणि जबरदस्त संघटित लढे उभे करून जनतेने सरकारला, दोन्ही पातळीवरील धोरणांची दिशा बदलण्यास भाग पाडले पाहिजे. नाहीतर सामान्य जनतेचा जीवनस्तर आणखी ढासळेल हे निश्चित!

**(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# जालना : जिल्ह्यातील आठही तालुक्यांत सीटूतर्फे जोरदार रस्ता रोको

बांधकाम कामगार, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कामगार, ग्रामरोजगार सेवक इ. योजना कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी सीटूच्या वतीने जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांच्या ठिकाणी १९ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट या दरम्यान रस्ता रोको आंदोलने करण्यात आली. १९ ऑगस्ट रोजी भोकरदन, जाफ्राबाद, २० ऑगस्ट रोजी जालना, बदनापूर, दि. २१ ऑगस्ट रोजी घनसावंगी, अंबड आणि २२ ऑगस्ट रोजी वाटूर फाटा इ. ठिकाणी जोरदार रस्ता रोको करण्यात आले. यामध्ये जिल्हाभरातून २,५०० ते ३,००० कामगार सहभागी झाले होते.

केंद्र सरकार व राज्य सरकार या असंघटित कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी उदासिन आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अजूनपर्यंत कायम दर्जा नाही. जे तूटपूंजे मानधन मिळते ते सुद्धा ४-४ महिने मिळत नाही, आशा वर्कर्स कर्मचाऱ्यांना तर सरकारने अजून मानधन देण्याचे मान्यच केलेले नाही. त्यांना तर नुसत्या तूटपूंज्या मोबदल्यावर शासन राबवून घेत आहे, त्याचप्रमाणे शालेय पोषण आहार कामगारांचीसुद्धा सरकारने अवहेलना लावली आहे, त्यांना कामावरून कमी करण्याचे षडयंत्र अधिकाऱ्यांकडून होत आहे. बांधकाम कामगारांसाठी २०११ साली कल्याणकारी मंडळ लागू झाले. परंतु अजूनपर्यंत या मंडळात या कामगारांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी कर्मचारीच नाहीत, योजना फक्त कागदावरच आहेत. एकूणच या असंघटित कामगारांच्या प्रश्नांवर सीटूने जिल्हाभर सर्व तालुक्यांत रास्ता रोको करत सरकारच्या विरोधात एल्गार पुकारला.

या आंदोलनाच्या दरम्यान संबंधित तालुक्यातील तहसीलदार, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षण अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी आंदोलनाच्या समोर येऊन आंदोलनाच्या स्थानिक मागण्या सोडविण्याचे आश्वासन दिले व राज्य पातळीवरील मागण्यांची त्वरित शिफारस करू असे सांगितले.

या आंदोलनांच्या मोहिमेचे नेतृत्व सीटूचे राज्य सचिव अण्णा सावंत, जिल्हा सरचिटणीस मधुकर मोकळे, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी मराडे, जिल्हा सचिव गोविंद आर्दड, मारोती खंदारे यांनी केले.

तसेच साजेदा बेगम, कांताताई मिटकरी, निर्मला देशपांडे, मंगलाताई नरंगळे, मथुरा रत्नपारखे, दगडाताई पितळे, मिराताई बोराडे, द्वारकाताई घोडके, काशीनाथ पाटोळे, सय्यद युनुस, युनूस पठाण, डिगांबर टेकाळे, सय्यद रफिक, शिवाजी राठोड, सर्जेराव बरसाले, अंकुश मोहिते, श्रीधर शिंदे, ज्ञानेश्वर गिरी, सदाशिव ब्रह्मे, प्रकाश गजभार, भैय्यासाहेब डोळसे, सुभाष मोहिते, रामराव राठोड, संजय गोंडगे, जिजाभाऊ देशमाने, राजू कांबळे, मधुकर पटेकर, अंबादास गायकवाड, शेख अहमद, सलिम मिस्त्री, अखिलभाई, परवेज पठाण, बंडूपंत कणसे, जितूसिंग राजपूत, रामकोर लहाने, सुनंदा पवार आदिंनी खूप परिश्रम घेतले.

**– गोविंद आर्दड**

# भाजप, अजब तुझे सरकार

प्रा. प्रभात पटनाईक

राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी एक अजब योजना आखली आहे. - सरकारने गरीबांसाठी चालवलेल्या विविध योजना बंद करून टाकायची 'योजना'. कारण ? राणीसाहेब म्हणतात, ''लोकांनी सरकारवर फार विसंबून राहता कामा नये!'' नवं सरकार आल्यावर नव्या कल्पना राबवल्या जाणं साहजिकच आहे. त्यात गैर काहीच नाही. म्हणजे जुन्या योजनात काही बदल केले, नव्या योजना आणण्यासाठी जुन्या गुंडाळून टाकल्या, गरीबांना जास्त चांगली मदत व्हावी म्हणून वेगळ्या रूपात नवे उपाय केले - आणि हे सारं गरीबांचं हित समोर ठेवून केलं - तर आपली तक्रार असायचं काहीच कारण नाही. अशा योजना खरोखरच परिणामकारक आहेत का, याची आपण तपासणी करून त्यावरचं आपलं मत देऊ शकतो. अशा उपाय आणि योजनांची तपशीलवार समीक्षा करून कोणता पर्याय चांगला आहे, हे सुचवू शकतो. पण राणीसाहेब असं म्हणत नाहीत. त्या एक धोरण सुचवत आहेत. भाजपच्या प्रतिगामी धोरणाची दिशा त्यांनी दाखवून दिली आहे. आणि भाजपनं देशभर तसं धोरण अवलंबायचं सूतोवाच त्यातून केलं आहे. राणीसाहेबांनी 'लवचिक श्रमबाजारपेठ' ही संकल्पना राजस्थानात राबवायची ठरवली आहे. लवचिक श्रमबाजारपेठ म्हणजे काय ? कामगार - कष्टकऱ्यांनी असीम त्याग, कष्ट सोसून आणि अविरत लढून मिळवलेले हक्क काढून घ्यायचे, त्यांच्या संघटना मोडून टाकायच्या. या संदर्भात राणीसाहेबांचा 'लोकांनी सरकारवर फार विसंबू नये' हा सल्ला तपासून पाहिला पाहिजे.

खरं तर 'व्यक्ती' हा उदारमतवादाचा पाया आहे. त्या विचारानुसार शासन हे व्यक्तीच्या आधारावर उभं असायला हवं. जॉन रॉल्स नावाचा एक कडवा उदारमतवादी विचारवंत आहे. पण तोदेखील गरीबांना किमान राहणीमान मिळावं यासाठी समाजात न्याय असला पाहिजे असं मानतो. आणि अशा किमान राहणीमानाची हमी शासनच देऊ शकतं. शासनाचा असा किमान आधार नसेल तर बाजारपेठेत विनिमयासाठी गेलेल्या व्यक्ती हवालदिलच होतात.

शासनाचा हस्तक्षेप दोन प्रकारे होऊ शकतो. एक तर ते जनतेच्या प्राप्तीत भर पडेल अथवा वस्तूंचे दर कमी करण्यासाठी अनुदान या अशा पावलांनी जनतेचं जीवनमान उंचावण्यास मदत करू शकतं. तसेच शासन लोकांना काही प्रमाणात संपत्ती हस्तांतर करून त्यांचं जीवनमान सुधारू शकतं. उपाय कोणताही स्वीकारला तरी तो कायमचा असावा लागतो. उदारमतवादी विचारवंतांचा या दोन्ही प्रकारच्या हस्तक्षेपांना आक्षेप नसतो. गरीब लोक शासनावर नेहमीच 'अवलंबून' असणार, हे तेही गृहित धरून असतात.

## अर्थशून्य युक्तिवाद

शासनाच्या कल्याणकारी उपायांना उजवे प्रतिगामी दोन प्रकारे विरोध करत असतात. प्रत्येक गरजूला दिलेली कल्याणकारी मदत जास्तच दिली जाते, नाही तर गरजेपेक्षा जास्त लोकांना दिली जाते. असे दोन युक्तिवाद ते करत असतात. या दोन्हीतील 'जास्त'म्हणजे किती हे त्यांनी स्पष्टपणे सांगायला हवं. इतके किलो दिलं की जास्त झालं, इतक्या लोकांना दिलं की अतिच झालं, असं त्यांना म्हणावं लागेल. पण हे प्रतिगामी लोक हा आकडा कधीच सांगत नाहीत. त्यामुळे त्यांचा हा दुहेरी युक्तिवाद पोकळ आणि अर्थशून्य ठरतो. राजस्थानच्या या राणीसाहेबांच्या बाबतीतही हे लागू पडतं. किती लोकांना किती मदद द्यावी याचं काहीच गणित त्या मांडत नाहीत. मुद्दा त्यांचं मत स्वीकारार्ह आहे की नाही हा नाहीच. त्या मताला काही अर्थ आहे का, हाच खरा मुद्दा आहे. अगदी उदारमतवादी देखील जे म्हणत नाहीत, ते या राणीसाहेब म्हणत आहेत, 'शासनानं गरीबांच्या भानगडीत पडायचं नसतं.'

हे मत निरर्थक आहे, असं म्हणायला आणखी एक कारण आहे. समाज-चित्रात शासन असू नये, असं म्हणायला वावच नाही. याचं कारण शासन तिथं आधीच ठाण मांडून बसलेलं असतं. व्यक्ती पोकळीत जगत नसते. ती जन्माला येते ती समाजातच. समाजात आधीच अस्तित्वात असलेल्या उत्पादनाच्या व्यवस्थेत. समाजाच्या आधी व्यक्ती असते काय ? नसते. इतिहासाची सुरुवात व्यक्तीपासून होत नसते. व्यक्ती ही इतिहासाची जनक नसून अपत्य असते. स्वतंत्र, स्वायत्त व्यक्ती खऱ्या अर्थानं जन्माला येते ती सरंजामशाही नष्ट होऊन त्या जागी भांडवलशाहीतील मुक्त स्पर्धा प्रस्थापित झाल्यावर. पण इथंही स्वतंत्र व्यक्ती हा केवळ आभास असतो.

या बाबतीत मार्क्स काय म्हणाला ते आपण पाहू. आपल्या ग्रुंडरिस या ग्रंथात तो म्हणाला. 'या मुक्त स्पर्धेच्या समाजात व्यक्ती नैसर्गिक बंधनापासून अलग असल्यासारखी भासते. हे बंध समाजाच्या आधीच्या ऐतिहासिक अवस्थेत त्याला एका मर्यादित समूहाचा अवयव बनवत असतात, भांडवली समाजात माणूस व्यक्ती भासतो. पण हा आभासाचा पडदा दूर सारून वास्तव पहायला हवं. माणूस नुसता व्यक्ती असत नाही. तो समाजात उत्पादन करणारा व्यक्ती असतो; 'म्हणून आपल्या विचाराची सुरुवात समाजाने निर्धारीत केलेल्या उत्पादनाच्या सुट्या, वैयक्तिक रूपापासून केली पाहिजे.'

व्यक्ती एका भौतिक परिस्थितीत जगत असतात. ही भौतिक परिस्थिती समाजात संपन्नता निर्माण करणारी असो वा दारिद्र्य निर्माण करणारी. व्यक्ती त्या परिस्थितीत घडत असतात. आणि त्या भौतिक परिस्थितीचं स्वरूप ठरत असतं, व्यक्ती ज्या समाजव्यवस्थेत उत्पादन करत असते त्यानुसार. उत्पादन वैयक्तिक असलं तरी ते कसं करायचं व्यक्ती स्वत: ठरवत नसते. समाजनियमांनी ते स्वरूप ठरत असतं. तो त्या व्यवस्थेचा अंगभूत नियम असतो. आता एखादी व्यक्ती त्या व्यवस्थेनुसार काम करायचं की नाही, हे ठरवू शकते. म्हणजे एखादा माणूस म्हणेल की, मी कामच करणार नाही, बेरोजगार राहीन. दुसरा म्हणेल, मी संन्याशासारखा जंगलात जाऊन जमेल तशी गुजराण करीन. याचा अर्थ त्या व्यक्ती स्पर्धात्मक भांडवलशाहीच्या व्यवस्थेपासून स्वत:ला तोडून अलग करून

राहतील. पण असं जगणं हा झाला अपवाद. नियम नव्हे. व्यवस्थेत राहून जगणारे लोक असं वैयक्तिक स्तरावर ठरवू शकत नाहीत. त्यांची भौतिक परिस्थिती त्यांच्या वैयक्तिक आवडी-निवडी, इच्छा-आकांक्षा यानुसार ठरत नाही. ती भौतिक परिस्थिती ठरत असते, व्यक्ती ज्या सामाजिक व्यवस्थेत उत्पादन करतात त्या व्यवस्थेनुसार. व्यक्तींनी अमुकच काम केलं पाहिजे, त्याचं स्वरूप असंच असलं पाहिजे असे साचे ती व्यवस्था बनवू शकते. त्या साच्यानुसार काम करणाऱ्या व्यक्तींच्या इच्छा आकांक्षा, आवडी-निवडी कामाच्या संदर्भात गैरलागू असतात.

उदाहरणार्थ, एखादी गरीब व्यक्ती घ्या. ती व्यक्ती आळशी असल्यानं गरीब आहे, असं म्हणता येतं. पण ते तसं म्हणणं वस्तुस्थितीला सोडून तर आहेच, शिवाय नैतिक दृष्ट्या घृणास्पददेखील आहे. मुळात ते तद्दन खोटं आहे. माणसाला काहीही न करता जगायला, 'आळसात' जगायला समाजव्यवस्था वाव ठेवतेच कुठं? सरंजामशाहीत नोकरानं आळस केला की त्याला 'वठणीवर' आणायला फटके दिले जायचे. राजे-रजवाड्यांच्या नोकरांना 'आळस' करायचं स्वातंत्र्य नसतं. वेठबिगाराला निवांत बसायचं स्वातंत्र्य असत नाही. भांडवलशाहीत 'आळस' करायचं स्वातंत्र्य आहे जरूर, पण मग त्यासाठी बेकारी, दैन्य, दारिद्र्य भोगायची तयारी हवी. कुणी हौसेनं उपाशी रहात नाही. 'उपवास' ही पोट भरत असेल तर करायची गोष्ट असते. तो रोज वा सकाळ-संध्याकाळ करायचा नसतो. तो अपवाद असतो, नियम नसतो.

तेव्हा भांडवलशाहीतदेखील व्यक्ती स्वायत्त, स्वतंत्र नसते. या व्यवस्थेत माणूस 'व्यक्ती' असल्याचा भास होतो. व्यक्तीचं रूप प्राप्त झालेला माणूस व्यवस्थेच्या अंगभूत नियमांनी बांधलेलाच असतो. ते नियम सोडून तो जगू शकत नाही. उत्पादनांच्या व्यवस्थेनं त्याला एक भूमिका दिलेली असते. ती भूमिका तो पार पाडत असतो. त्या व्यवस्थेच्या अंगभूत नियमांचे भले-बुरे परिणाम भोगत रहातो. इच्छा असो वा नसो.

तेव्हा व्यक्तीचं भौतिक जगणं ही ती व्यक्ती ज्या समाजव्यवस्थेत उत्पादक काम करत असते त्या व्यवस्थेचा परिणाम असतो. एखादी व्यक्ती गरीब असेल तर तो त्या व्यवस्थेचा परिणाम असतो. किंवा एखादा श्रीमंत असेल तर तोही त्या व्यवस्थेमुळेच तसा असतो. आणि अशी व्यवस्था शासनाशिवाय चालूच शकत नाही. तेव्हा समाजव्यवस्थेच्या चित्रात शासन असतंच. शासन समाजव्यवस्थेत बाहेरून घुसडायचा प्रश्न गैरलागू म्हणून खोटा आहे. लोकांनी शासनावर 'विसंबून' रहावं की नाही, हा प्रश्नही त्यामुळे गैरलागू आणि खोटाच आहे. 'नकारात्मक' रित्या असले तरी, लोक शासनावर सदैव अवलंबून असतातच. याचे कारण ते ज्या भौतिक परिस्थितीत जगत असतात त्या परिस्थितीवर शासनाचे नियंत्रण असते. लोक शेवटी शासनावर अवलंबून असतात. त्यांची इच्छा असो वा नसो.

## भांडवलाच्या हिताची कोण चिंता

शासनानं हस्तक्षेप करता कामा नये याचा खरा अर्थ असतो आम्ही म्हणतो तसा हस्तक्षेप केला पाहिजे! सर्व लोकांचे उत्पन्न वाढावे, म्हणून शासनानं हस्तक्षेप करावा, असं खुद्द उदारमतवादीदेखील म्हणतात. पण भांडवलशाहीत शासनानं हस्तक्षेप करू नये, 'ती नीट चालू द्यावी, म्हणून हात बांधून बसावे' या म्हणण्याचा काय अर्थ असतो? भांडवलदारांना 'सवलती' मिळाव्यात, त्यांची संपत्ती वाढत रहावी असा हस्तक्षेप करत बसावे.

'लोक शासनावर फार विसंबून आहेत' या ओरड्यामागं एक मतलब दडलेला असतो. 'भांडवलाची चिंता वहाण्याचं स्वातंत्र्य शासनाला द्या', हा तो मतलब. भांडवलाची चिंता म्हणजे कोपऱ्यावरच्या वाण्याची चिंता नव्हे. ती असते, कॉर्पोरेट घराण्यांची चिंता. अदानी-अंबानी या देशी आणि इतर विदेशी बड्या, कॉर्पोरेट घराण्यांची चिंता. शासन भांडवलाच्या हिताचा करत असलेला पक्षपात झाकण्यासाठी राणीसाहेब कांगावा करत आहेत, 'लोक आपल्या अवस्थेला स्वत:च कारणीभूत आहेत. गरीबीत रहायचं की नाही हे त्यांनीच ठरवायचं आहे. वर यायचं असेल तर त्यांनी शासनाच्या आधाराची अपेक्षा करता कामा नये.'

समाजवादी सिध्दांताचा आरंभबिंदू कोणता? व्यक्ती ही आपल्या भौतिक अवस्थेला स्वत: कारणीभूत नसते, ती समाजव्यवस्थेचं अपत्य असते, हा तो आरंभबिंदू. समाजात वस्तूंचं वितरण कसं होतं हे त्या भौतिक परिस्थितीला विशिष्ट रूप देत असतं. पण हे वितरण कुणाला किती व्हावं - म्हणजे कुणाला काय काय आणि किती खायला मिळावं, कुणी कसल्या घरात रहावं, कुणाला आजारपणात कसलं औषधपाणी मिळावं, कुणाला किती आणि कुठं शिक्षण मिळावं, कुणाला कशा प्रकारचा आनंद घेता यावा - हे सारंच्या सारं उत्पादनाच्या साधनांची मालकी कुणाकुणाला कशी वाटली आहे यावर ठरतं, उत्पादन साधनांच्या मालकीत बदल केल्याशिवाय व्यक्तींच्या भौतिक अवस्थेत बदल करता येत नाही. शासन हे विशिष्ट उत्पादन पद्धतीचं संरक्षण करत असल्यानं व्यक्तींच्या भौतिक अवस्थेत बदल घडवून आणणं शक्य नाही. यासाठी उलथून टाकायला हवं ते हे शासनच.

शासन 'लोकांच्या भानगडीत' पडत नाही. म्हणून ते उलथून टाकायचं नसतं. आताचं शासन लोकांच्या भौतिक अवस्थेत बदल करू शकत नाही, म्हणून ते बदलायचं असतं. शासन हे नेहमीच लोकांच्या भानगडीत पडत असतं. फक्त ते लोकांच्या बाजूनं नव्हे तर भांडवलाच्या बाजूनं भानगडीत पडत असतं. ते भांडवलाच्या बाजूनं हस्तक्षेप करतं, म्हणून उलथून टाकायचं असतं.

व्यक्ती आपल्या अवस्थेला स्वत:च जबाबदार आहेत, या म्हणण्याचा अर्थ काय असतो? 'आहे ही व्यवस्था कायम रहावी. आताची व्यवस्था आदर्श' आहे. लोक गरीब असतील तर तो त्यांचा स्वत:चा दोष आहे. अशा बेजबाबदार लोकांना शासनानं हस्तक्षेप करून मदत करणं, म्हणजे त्यांना आणखी बेजबाबदार बनवणं.'

हा असतो उजव्या प्रतिगाम्यांचा खास आवडता युक्तिवाद. त्यांना आहे ही व्यवस्था कायम ठेवायची असते. शासनानं भांडवलाची इमाने-इतबारे चाकरी करत रहावे, अशी त्यांची भूमिका असते. ही भावना राणीसाहेबांच्या मुखातून बाहेर पडली आहे. भारतातले राजकारणी आजवर असं म्हणत नव्हते. आता ते म्हणू लागले आहेत. त्याचा पहिला उच्चार केला आहे, राजस्थानच्या राणीसाहेबांनी. विजयाराजेंनी. हा अपघात नव्हे. हे कारस्थान आहे. हा अपवाद नव्हे. नियम होण्याची भीती आहे. काय करू या?

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# मोदी सरकारच्या कामगारविरोधी नीतीचा जोरदार विरोध करा!

**सईद अहमद**

देशाचा विकास घटतो आहे आणि संसदेत निवडून आलेल्या खासदारांच्या आर्थिक संपत्तीत जोरदार वाढ होत आहे. २००९ मध्ये ५३ टक्के खासदार करोडपती होते, आज त्यांची संख्या वाढून ८ टक्के झाली आहे. यात अधिकाधिक खासदार भाजपचे आहेत. जे बहुतांशी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि पंजाबमधील आहेत. ते कामगारांचे प्रतिनिधी आहेत काय?....ते शेतकरी, शेतमजूर आणि असंघटीत मजुरांच्या बाजूने बोलतील काय? नाही, ते त्यांचे शोषणच करतील. २००८ पासून दररोज १,८०० रोजगार कमी होत आहेत आणि दररोज २,००० शेतकरी आपली जमीन गेल्यामुळे शेतकरी रहात नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत कामगारांसाठी सुधारीत कामगार कायदे बनवण्याचे सांगितले होते. त्यांचा विचार कामगारांना अधिकार देण्याचा, कायम व सुरक्षित कामाची संधी प्रदान करण्याचा होता. परंतु आताचे सरकार मात्र कामगार कायद्यांमधील सुधारणेच्या नावाने मालकांना कामगारांवर अमर्याद अधिकार आणि शोषणाचा अधिकार देण्याचा कायदा तयार करत आहे. केंद्रात आता भाजप नेतृत्वाखालील पूर्ण बहुमताचे सरकार निवडून आले आहे. या सरकारला बडे भांडवलदार आणि शेअरबाजाराच्या दलालांचे समर्थन प्राप्त झाले आहे.

भाजपने लोकसभा निवडणूक प्रचारात १५,००० करोड रुपये खर्च केले. ज्यांनी हे पैसे त्यांच्यासाठी खर्च केले त्यांना आता ते व्याजासकट परत देत आहेत. राजस्थानात भाजपच्या वसुंधरा राजेंच्या सरकारने फॅक्टरी ॲक्ट, औद्योगिक विवाद निर्धारण कायदा आणि कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टमध्ये जे मालकधार्जिणे बदल केले ते पुढीलप्रमाणे आहेत:

१. ज्या कंपनीत ३००पेक्षा कमी कामगार काम करतात, ती कंपनी बंद करण्यासाठी आता सरकारची परवानगी घ्यावी लागणार नाही. राजस्थानात ७,३२२ कारखाने आहेत. हा कायदा लागू झाल्यास राजस्थानातील ७, २५२ कारखाने बंद करण्यासाठी मालकांना आता शासनाची अनुमती घेण्याची आवश्यकता नाही. फक्त ३७० कंपन्या या कायद्याच्या अंतर्गत येत नाहीत.

२. फॅक्टरी ॲक्टच्या कलम १५६ नुसार ८ तास काम ठरलेले आहे. आता हे कामाचे तास १० ते १२ तासांपर्यंत वाढवले जातील आणि मालकांना जास्त वेतन दिल्याशिवाय कामगारांकडून १२ तास काम करून घेण्याचा अधिकार मिळेल.

३. कलम ६६ मध्ये बदल करण्यात येत आहेत. जेथे महिलांना रात्रपाळीत काम करण्यास बंदी आहे, तेथे आता मालक त्यांना रात्रपाळीतसुद्धा कामावर ठेवू शकतील.

४. शासनाला प्रत्येक व्यवसायात किमान वेतन निश्चित करावे लागते आणि सहा महिन्यांनंतर महागाई भत्त्यात बदल करावा लागतो. नवीन कायद्याच्या बदलानंतर ही व्यवस्था बंद केली जात आहे.

५. कंपनीत शिकाऊ कामगार घेतले जातात. या प्रकारच्या कामगारांना किमान वेतनाच्या ७० टक्के वेतन मिळते. कायद्याच्या नवीन बदलामुळे शिकाऊ कामगारांना कायम कामगारांच्या जागी वर्षानुवर्षे काम करण्याचे प्रावधान आहे. मारुती, एम.आर.एफ.सारख्या कंपन्या हजारो शिकाऊ कामगार भरती करून उत्पादन करतात. 'फॅक्टरी ॲक्ट' आज जेथे विजेने काम होते तेथे १० व इतर ठिकाणी २० कामगारांसाठी लागू आहे. त्याला आता बदलून २० आणि ४० केले जात आहे. आता ५० पेक्षा कमी कामगारांकडून वेठबिगारांप्रमाणे काम करून घेतले जाईल.

६. भारतात १,५७,७१० कारखाने आहेत. त्यात १,३४,२९,९४६ कामगार काम करतात. त्यात ३६,१०,०४६ कॉन्ट्रक्ट लेबर आहेत. ७२ टक्के कारखान्यांना कामगाराला कामावर ठेवणे व काढून टाकण्याचा पूर्ण अधिकार असेल. कामगारांना मात्र कायम होण्याचा अधिकार नसेल.

७. भारतात भांडवलदारांना ५ लाख करोड रुपयांची सबसिडी देण्यात आली आहे आणि मालकांनी बँकांचे कित्येक लाख करोड रुपये बुडवले आहेत, परंतु सरकार काहीच करत नाही.किंगफिशरचा मालक विजय मल्ल्या हे त्याचे मोठे उदाहरण आहे.

माझा टायरच्या व्यवसायाशी संबंध आहे. त्यात मालकांचा कसा फायदा करून देण्यात आला हे पुढील उदाहरणांवरून लक्षात येईल.

८. मंदी आल्यावर सरकारने मालकांना मदतीसाठी टायरवर असणारी 'एक्साईज ड्युटी' २४ टक्क्यांवरून कमी करून ती १२.३६ टक्के केली. उदाहरणार्थ - १० हजार टायर्ससाठी पूर्वी २,४०० रुपये ड्युटी भरावी लागत असे. जी आता फक्त १,२०० रु. भरावी लागते. याद्वारे प्रत्येक महिन्यात प्रत्येक कारखान्याला शेकडो करोड रुपयांचे दान सरकारने दिले आहे. ज्यामुळे मालकांचा फायदा कित्येक पटीने वाढला आहे.

९. मुंबईत बेस्टचे कामगार २५ हजारांपेक्षा जास्त आहेत. ते आठ तास काम करतात. महानगरपालिकेत गेल्या १५ वर्षांपासून शिवसेना-भाजपची सत्ता आहे. त्यांनी एका खाजगी कंपनीला ४२ कोटी रुपये फी देऊन नवीन वेळापत्रक तयार करण्याचे काम दिले. त्याला 'कॅनेडियन शेड्युल' म्हणतात. त्यांच्या शिफारशींवरून आता 'बेस्ट'च्या कामगारांना १२ तास काम करावे लागेल. शासनाच्या कामगारविरोधी धोरणाचा हा एक अजब नमुना आहे. मोदी सरकारने योजना आयोग बंद करण्याची घोषणा केली आहे. 'मनरेगा'सारख्या कल्याणकारी योजना बंद करण्याचे हे षडयंत्र आहे.

सर्व ट्रेड युनियन्सच्या केंद्रीय संघटनांनी या धोरणाच्या विरोधात संघर्ष करण्याचे ठरविले आहे आणि दिल्लीत १५ सप्टेंबर २०१४ रोजी या विरोधात परिषद घेऊन या नितीच्या विरोधातल्या कार्यक्रमाची घोषणा केली गेली आहे.

□□□

# पॅलेस्टाईनवर इस्त्राएलचा हल्ला : ऐतिहासिक पार्श्वभूमी

**आर. अरुणकुमार**

'आजच्या काळातील राजकुमार, ज्यांचे नाव घेणे योग्य ठरणार नाही, जो सदैव शांतता आणि विश्वासाचा उपदेश देत असतो आणि ह्या दोघांप्रती सर्वात जास्त शत्रुत्व बाळगत असतो.' (मेकावली द प्रिन्स मधून) मेकावली यांनी ही गोष्ट फर्डीनेंड ऑफ अर्गो यांच्याबाबतीत म्हंटली असली, तरी आज अमेरिकेचे राष्ट्रपती बराक ओबामा यांना ही तंतोतंत लागू पडते. विशेषत: शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवलेले आणि युध्द विरोधी भूमिका घेऊन निवडणुका जिंकलेले हे गृहस्थ आहेत. राष्ट्रपतीपदाच्या आपल्या दुसऱ्या कार्यकाळाच्या अगदी मधोमध असताना त्यांनी मेकावलीवादाचा खरा रंग दाखविण्यास सुरुवात केली आहे. आणि यात अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री ओबामा यांची मदत करीत आहेत. ते आता इस्त्राएलमध्ये होते, त्या आधी युक्रेनमध्ये, युध्दांची आग क्षमविण्याच्या बहाण्याने पूर्ण जगभर ते फिरत आहेत. आता ही दुसरी गोष्ट आहे की, ही त्यांच्या पूर्वजांचाच आग लावण्याचा वारसा पुढे घेऊन ते जात आहेत. इस्त्राएल, अल-कायदा, तालिबान, आयएसआयएस, युक्रेनचे नवनाजी आणि इतर असे घटक जे युध्दासाठी कारणीभूत आहेत अशा घटकांना अमेरिका आणि युक्रेनचे इतर साथीदार आर्थिक आणि हत्याररूपी मदत करतात यात काहीच शंका नाही.

जगभरात आणि विशेषत: जे भाग नैसर्गिक साधनसंपत्ती सधन आणि नवीन सागरी मार्गावर आहेत अशा देशांतील अराजकता संपविण्याच्या नावाखाली साम्राज्यवाद आपल्याला भयंकर असा नरसंहार दाखवीत आहे. साम्राज्यवादाने इराक आणि अफगाणिस्तानमध्ये मानवतेला दिलेल्या धक्क्यातून सावरत नाही तोच त्यांनी सिरिया आणि लिबियाकडे मोर्चा वळविला. नंतर युक्रेन आणि आता परत इराक आणि पॅलेस्टाइन. व्यापारीकरणाच्या या युगात साम्राज्यवादी शक्ती आपल्या भावनांना निष्ठुर बनवत आहेत. आज पॅलेस्टाईनमध्ये होत असलेल्या हत्या किंवा आजवर झालेल्या हत्या म्हणजे येणाऱ्या पिढीसाठी वाचण्यासाठी इतिहासातील फक्त नोंदीच!

## साम्राज्यवादी इस्त्राएल

इस्त्राएलने गाझावर आणखी एक युध्द लादले आहे. या युध्दात आतापर्यंत शेकडो निरपराध नागरिक मारले गेले आहेत. याची इस्त्राएल सांगत असलेली पार्श्वभूमी अशी; कोणी अज्ञात लोकांनी ज्यांची ओळख अजून पटू शकली नाही, अशांनी तीन इस्त्राएली लोकांचे अपहरण करून त्यांची हत्या केली. इस्त्राएल सरकारने जरासाही वेळ न दवडता ह्या हत्या 'हमास'ने केल्याचे जाहीर केले आणि त्याची शिक्षा सर्व पॅलेस्टाईन नागरिकांना देण्याचे ठरविले. कारण त्यांनी 'हमास'ला सत्तेत आणण्याचा गुन्हा केला होता ना! पण त्याच वेळेला, हा हल्ला करताना इस्त्राएलने अनेक आंतरराष्ट्रीय युध्दबंदीच्या कराराचे अनेक वेळा निर्लज्जपणे उल्लंघन केले आहे. याची चर्चा कमी किंवा होतानाच दिसत नाही.

या संदर्भातील काही आकडेवारी पाहू. सन २००० पासून आतापर्यंत इस्त्राएलने केलेल्या हल्ल्यात पॅलेस्टाइनमधील १५० पेक्षा जास्त लहान मुले मारली गेली असून, याच कालावधीत इस्त्राएलमध्ये १३२ लहान मुले मरण पावल्याची नोंद आहे. २००९ मध्ये गाझा मध्ये घडवून आणलेल्या नरसंहारामध्ये विविध अनुमानानुसार १,४०० ते ७,००० पॅलेस्टाइन नागरिक मरण पावले, दुसरीकडे १३ इस्त्राएली नागरिक स्वत:च्या देशबांधवांच्या गोळीमुळे मारले गेलेले आहेत. युध्दबंदी उल्लंघनाच्या जेवढ्या घटना घडल्या त्यातल्या अधिकाधिक इस्त्राएलकडून घडल्या आहेत. संयुक्त राष्ट्र संघाच्या कराराचे सर्वात जास्त वेळा उल्लंघन करणारे राष्ट्र म्हणजे इस्त्राएल. एवढे सर्व आरश्यासारखे समोर असताना फक्त 'हमास' ला कारणीभूत ठरविणे चुकीचे आहे. आता ही गोष्ट वेगळी की, इस्त्राएल खोटे बोलण्यामध्ये पटाईत आहे.

## ऐतिहासिक गोष्टी

येरुशेलम आणि त्याच्या आसपासच्या भागाला ख्रिश्चन, मुस्लिम आणि यहुदी लोक पवित्र मानतात आणि आपआपल्या धर्माच्या उगमाशी जोडतात. या धर्माच्या प्रचार-प्रसाराशी निगडीत अनेक कथांद्वारे या भागात कोणा एकाचेच वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. 'तेलअविव' विद्यापीठातील प्राध्यापक 'सी जेज्म हेरोग' ने मागील दीडशे वर्षात झालेल्या पुरातत्व उत्खननांचा अभ्यास करीत 'हे अरेत्ज' या मासिकात समीक्षा लिहिली. त्यात ते म्हणतात, 'इस्त्राएल'मध्ये आतापर्यंत झालेल्या पुरातत्व उत्खननातून काही गोष्टी समोर आल्या त्या अशा - इस्त्राएली कधी अरब देशात नव्हते, ते कधी ही वाळवंटात भटकले नाहीत. अजून एक गोष्ट मान्य करणे कठीण ते म्हणजे, डेव्हिड आणि सोलोमनचे साम्राज्य, ज्याचा बायबलमध्ये देखील उल्लेख आहे, ते एका आदिवासी क्षेत्रापेक्षा जास्त मोठे नसेल.

अपेक्षेप्रमाणे नंतरच्या काळात इतिहास मात्र असे सांगण्यात येतो की, एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पहिल्यांदा यहुदी लोक येथे राहण्यास आले. आणि त्याकाळात एकूण लोकसंख्येपैकी ३ टक्के यहुदी तर ९७ टक्के अरब लोक होते. त्या वेळेपासून यहुदींसाठी वेगळ्या राष्ट्राची मागणी जोर धरू लागली होती. त्यावेळेस तिथे ब्रिटनचा प्रभाव आणि नियंत्रण होते. म्हणून यहुदी नि त्यांच्याशी चर्चा सुरू केली. ब्रिटन आणि उस्मानी साम्राज्य यांचेतील कटू संबंधही त्यांच्या पथ्यावर पडले. पहिल्या महायुध्दादरम्यान ब्रिटन आणि उस्मानी विरोधी गटात होते. युध्द संपेपर्यंत उस्मानी साम्राज्याचाही अंत झाला.

पहिल्या महायुध्दादरम्यान ब्रिटन आणि फ्रान्समध्ये कुख्यात असा 'सायकेस-फिकिट करार' झाला. या गोपनीय करारान्वये पश्चिम आशियातील कुठला भाग कुणाच्या नियंत्रणाखाली असावा याबद्दल निर्णय घेण्यात आला. आणि जो भाग अरब महाद्वीपाच्या बाहेर असणारा पण उस्मानी साम्राज्यात आहे अशा सर्व प्रांतांना भविष्यात आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी ते भाग वाटून घेण्यात आले. खरे पाहता यात रशियातील झार सरकारदेखील सामील होते. पण १९१७ तील महान ऑक्टोबर क्रांतीनंतर कॉ. लेनिनच्या नेतृत्वाखाली आलेल्या सरकारने या कराराचे आणि साम्राज्यवादी इच्छाशक्तीचे खरे स्वरूप समोर आणले आणि करार संपुष्टात आणला. त्या दरम्यान आलेली एक घोषणा विशेष आहे, ती म्हणजे 'बेलफोर घोषणा'. 'महाराणीचे सरकार पॅलेस्टाइनमधील यहुदी लोकांसाठी वेगळे राष्ट्र निर्माण करण्याच्या बाजूने आहे आणि हे लक्ष्य साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल'

## साम्राज्यवाद्यांचा खेळ

डेव्हिड लॉर्ड त्यावेळी ब्रिटनचे पंतप्रधान होते. त्यांनी स्पष्ट शब्दांत त्यांची मनीषा सांगितली. 'या नाजुक परिस्थितीमध्ये असे समजले जात आहे की, यहुदी सोबत मैत्री किंवा शत्रुत्व मित्र राष्ट्रांच्या लक्षांवर परिणाम करणारे आहे. पण यहुदींसोबतची मैत्री ही अडचणी निर्माण करू शकते. या वरून स्पष्ट होते की, या भागातील विभाजन साम्राज्यवादी आंकाक्षेनुसार होत होते. त्यात तिथे राहणाऱ्या नागरिकांचा तसूभरही विचार केला जात नव्हता. आजचा हा

पॅलेस्टाइनमधील नरसंहार शंभर वर्षापूर्वी लावलेल्या विषारी झाडांची फळे आहेत.

१९३० दशकात नाझींचा वाढता प्रभाव आणि एकूणच यहुदींवर वाढत जाणारे अत्याचार यामुळे यहुदी लोकांनी स्थलांतर सुरू केले. त्यातील काही पॅलेस्टाईनमध्ये जाऊन राहू लागले. स्थानिक अरब सरकारने संख्या आटोक्यात ठेवण्याचा असफल प्रयत्न केला. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र ब्रिटन आणि फ्रान्सची ताकत कमी झाली. त्यांच्या नियंत्रणाखाली असलेला प्रदेश त्यांना सोडावा लागला. पण नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला हा प्रदेश ते सहजासहजी सोडतील तर ते साम्राज्यवादी कसले ? त्या दरम्यान तयार झालेल्या संयुक्त राष्ट्र संघाच्या सहाय्याने त्यांनी पॅलेस्टाईनला दोन देशांत विभागले, एक पॅलेस्टाईन आणि दूसरा इस्त्राएल.

२९ नोव्हें. १९४७ ला संयुक्त राष्ट्राच्या महासभेने १८१(२) या प्रस्तावाला मान्यता दिली. या प्रस्तावात पॅलेस्टाइनचे विभाजन आणि त्याची अंमलबजावणी याला मंजूरी देण्यात आली होती. या योजनेनुसार पॅलेस्टाइनचे त्रिभाजन करण्यात आले. एक अरब, एक यहुदी आणि येरूशेलम शहर. पॅलेस्टाइनच्या नागरिकांनी याला विरोध केला पण बेन गुरिया यांच्या नेतृत्वाखालील यहुदींनी या निर्णयाचे स्वागत केले. कारण त्यांना २८ टक्के जागेवर मालकी मिळणार होती.

## इस्त्राएलचा विस्तारवाद

बेन गुरिया ने १५ मे १९४८ रोजी इस्त्राएलच्या एकत्रीकरणाचा नारा दिला. लोकसंख्येने निम्मे असलेल्या म्हणजे ७ लाख ५० हजार पॅलेस्टाइन नागरिकांना एका छोट्या भागात ढकलून दिले. तो भाग म्हणजे आजचा गाझा आणि पॅलेस्टाइनची पश्चिमी किनारपट्टी म्हणून ओळखला जातो. संयुक्त राष्ट्राद्वारा पॅलेस्टाइनच्या नागरिकांसाठी सुरक्षित अशा भागात देखील इस्त्राएलने आपल्या कुरापती चालुच ठेवल्या. पॅलेस्टाइन नागरिकांकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेली चांगली जमीन आणि पाणी यांसारख्या नैसर्गिक संपत्तीपासून वंचित ठेवून त्यांना या भागातून हाकलून लावणे हीच इस्त्राएलची रणनीती आहे. इस्त्राएलच्या एकत्रीकरणानंतर लगेचच पॅलेस्टाइनविषयी सहानुभूती दाखविणारे राष्ट्र जसे, इजिप्त सिरिया, लेबनॉन तसेच जॉर्डन या राष्ट्रांवर हल्ला केला. पण यात त्यांना हार सहन करावी लागली त्यात शंका नाही. पण तेव्हापासून आज पर्यंत इस्त्राएल आपल्या सीमा विस्तारण्याचा प्रयत्न करीत आहे.

पश्चिम आशियावर नियंत्रण तसेच निगराणी ठेवण्यासाठी साम्राज्यवाद्यांनी सुरूवातीपासूनच इस्त्राएलचा वापर केला आहे. उदाहरण द्यायचे झाले तर, इजिप्तच्या नासीरने 'स्वेज नाहर'च्या राष्ट्रीयीकरणाची घोषणा केली तेव्हा ब्रिटन आणि फ्रान्स ने इस्त्राएलला सोबत घेत सिनाई बेटावर हल्ला केला होता. याच दरम्यान १९६४ साली यासर अराफतच्या नेतृत्वाखाली पॅलेस्टाइनला इस्त्राएलपासून मुक्त करण्याच्या उद्देशाने 'पॅलेस्टाइन मुक्ति संघटना' स्थापन करण्यात आली.

१९६७ हे वर्ष इस्त्राएल-पॅलेस्टाईन यांच्या संघर्षातील एक महत्वपूर्ण वर्ष आहे. अमेरिकेच्या मदतीने इस्त्राएलने पुन्हा शेजारी राष्ट्रांवर पुन्हा हल्ला चढविला. त्यात इजिप्तचे सिनाई बेट, सिरियाचा गोळण भाग, जॉर्डनच्या नियंत्रणाखालील पश्चिमी किनारपट्टी आणि येरुशेलमचा काही भाग यावर नियंत्रण मिळविले. याप्रकारे एकूण ७८ टक्के पॅलेस्टाइनच्या भूभागावर इस्त्राएल ने कब्जा केला. पण अमेरिकेसोबत झालेल्या करारानंतर इस्त्राएल ने सिनाई बेट इजिप्तला परत केले. पण इतर क्षेत्रावर अजूनही त्यांचे नियंत्रण आहे.

१९८०च्या दशकात कुख्यात 'यीनोन योजना' समोर आली. इस्त्राएलची नेमकी रणनिती काय आहे ? ते जगाला माहिती झाले. 'यीनोन योजने'अंतर्गत इस्त्राएलसाठी एक रोडमॅप बनविला होता त्यामध्ये इस्त्राएलला या भागातील महाशक्ती कसे बनविता येईल आणि या भागातील मोठे देश जसे की, इराकला कमजोर करता येईल या विषयी ती योजना होती. इस्त्राएलने पॅलेस्टाइनच्या उरल्यासुरल्या भागावर देखील कब्जा मिळविण्याकरिता सुनियोजितपणे मोहिम आखली. यासाठी पॅलेस्टाइनच्या भागात यहुदींची वस्ती वाढविण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले. इस्त्राएलचा या आक्रमकतेला विरोध म्हणून पी.एल.ओ. ने पहिल्यांदा लोकांचा विद्रोह उभा केला. पण याचा उलटा परिणाम म्हणून इस्त्राएलने आत्मरक्षेच्या खोट्या नावाखाली पॅलेस्टाइनच्या विरोधात युध्दाची मोहिमच चालू केली.

सोव्हिएतच्या पतनानंतर पी.एल.ओ.ने लढाईचा मार्ग सोडून देण्याचा निर्णय घेतला. १९९० च्या दशकात इस्त्राएल सोबत शांततेच्या वाटाघाटी सुरू केल्या. आणि १९९३चा प्रसिध्द 'ऑस्लो करार' झाला. त्यानंतर १९९३ ते १९९९ पर्यंत शांततेसाठी प्रयत्न झाले, चर्चा झाल्या. या मध्ये एकच भावना होती, दोन्ही राष्ट्रांमध्ये विश्वास निर्माण होऊन अनेक जटिल मुद्दे सोडवता येऊ शकतील. यामध्ये काही महत्वाच्या गोष्टींवर एकवाक्यता झाली. पहिली म्हणजे चर्चेचा हा कार्यकाल अनिश्चित काळापर्यंत चालणार नाही. दुसरे म्हणजे, कुणीही असे काही करणार नाही की या शांततेच्या चर्चेला बाधा पोहोचेल. तिसरे आणि शेवटी असा करार करण्यात आला की सुरक्षा परिषदेने दिलेल्या प्रस्तावाना २४२ आणि २३८चे काटेकोर पणे पालन करण्यात येईल. आपल्या शक्तीचा वापर करून कोणी दुसऱ्यांची जमीन हडप करणार नाही. तसेच इस्त्राएलच्या कब्जात असलेल्या भागावरील नियंत्रण तो हळूहळू सोडेल पण दरम्यानच्या काळात इस्त्राएलकडून अनेक वेळा आंतरराष्ट्रीय शस्त्र संधीचे उल्लंघन करण्यात आले. पॅलेस्टाइन बरोबरचा दर्जा देण्यात इस्त्राएल कुचराई करू लागला.

## नवीन शतकातही इस्त्राएलची जुनीच चाल


एकविसाव्या शतकात इस्त्राएलची हल्ला करण्याची प्रवृत्ती तिच्या उच्च स्थानावर पोहचली. आता त्याने एक अवैध भिंत उभी केली. त्यामुळे पॅलेस्टाइन फक्त १२ टक्के भागातच राहिला. ६६३ किलोमीटर लांबीची ही भिंत १९६७च्या सीमेपेक्षा दुप्पट लांबीची आहे. ही भिंत म्हणजे सर्व आंतरराष्ट्रीय कराराचे उल्लंघन आणि ऑस्लोच्या इस्त्राएलने मान्य केलेल्या कराराचे सरासर उल्लंघन आहे. यामुळे इस्त्राएलने ६० टक्के भूभाग आणि ६० टक्के नैसर्गिक साधन संपत्ती यावर तसेच पश्चिम किनारपट्टीवर नियंत्रण मिळविले. आता पॅलेस्टाइनकडे शिल्लक असलेला ४० टक्के भूभागही तुकड्यांमध्ये विखुरलेला आहे.

याचा परिणाम असा झाला की, आज पॅलेस्टाइनकडे फक्त एक गाझा पट्टी आहे त्याच्या तिन्ही बाजूने इस्त्राएल तर चौथ्या बाजूला भूमध्य समुद्र आहे. दक्षिणेला एक छोटीसी सीमा इजिप्तला लागून आहे पण त्यावर देखील नवीन इजिप्त सरकारच्या सहाय्याने इस्त्राएलने ती ही बंद केली आहे. याप्रकारे गाझाला एक प्रकारे तुरुंगच बनविले आहे. इस्त्राएल अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय गाझामध्ये काही जाऊ शकत नाही आणि काही बाहेर येऊ शकत नाही. याप्रकारे गाझाची कोंडी करत आहे आणि २००६च्या निवडणुकीमध्ये 'हमास'च्या विजयानंतर तर पंजा आणखीनच कसत आहे. आणि अगदी नालायकपणे आपली धोरणे बरोबर आहेत असे सांगत आहे. एकेकाळचे इस्त्राएलचे पंतप्रधान म्हणाले होते की, पॅलेस्टाइन नागरिकांना खाणे कमी द्यायचे पण भुकेने नाही मारायचे. यावरून त्यांची क्रूरता लक्षात येते.

ही सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेवून आज गाझावर होत असलेल्या हल्ल्यांकडे पाहिले पाहिजे. इस्त्राएलचा आक्रमक आणि अमानवीय चेहरा समोर आणण्याची गरज आहे.

**(अनुवाद : डॉ. रविंद्र मदने)**

# कॉ. विनय कोनार यांना आदरांजली



पक्षाचे व किसान आंदोलनातील वरिष्ठ नेते कॉम्रेड विनय कोनार यांचे १४ सप्टेंबरला वयाच्या ८४व्या वर्षी निधन झाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पोलिट ब्यूरो त्यांच्या दु:खद निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करीत आहे.

१९४८मध्ये विनय कोनार पक्षाचे सभासद झाले. आपले मोठे भाऊ हरेकृष्ण कोनार यांच्या पावलावर पाऊल टाकत त्यांनीही बरद्वान येथे किसान आंदोलनाला संघटीत करण्यासाठी झोकून दिले. गरीब शेतकऱ्यांचे आणि शेतमजूरांचे अनेक संघर्ष त्यांनी लढविले. त्यानंतर पश्चिम बंगालमधील किसान आंदोलनाचे ते एक प्रमुख नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी पश्चिम बंगाल राज्य किसान सभेचे सरचिटणीस आणि अध्यक्ष म्हणून काम केल्यावर ते अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. त्या पदावर ते बरीच वर्षे होते.

विनय कोनार पक्के मार्क्सवादी-लेनिनवादी होते. १९८२ पासून ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीवर होते. तसेच १९९१ मध्ये ते राज्य कमिटीच्या सचीव मंडळावर निवडले गेले. १९९५ मध्ये ते पक्षाच्या केंद्रिय कमिटीवर निवडले गेले आणि २०व्या पक्ष काँग्रेसमध्ये त्यांना पक्षाच्या केंद्रीय नियंत्रण आयोगाच्या अध्यक्षपदी निवडण्यात आले. मेमारी मतदार संघातून ते तीन वेळा विधानसभेवर निवडून गेले होते.

आपल्या राजकीय जीवनात त्यांना अनेक वेळा पोलिसी दडपशाहीला तोंड द्यावे लागले होते. अनेक खोट्या खटल्यात त्यांना गुंतविण्यात येऊन जेलमध्ये घालण्यात आले होते. त्यांनी सहा वर्षे आणि नऊ महिने तुरुंगात काढले आणि बरद्वान येथील किसान संघर्षाच्या वेळेस बराच काळ भूमीगत अवस्थेत काढला आहे.

विनय कोनार यांनी कम्युनिस्ट पक्षासाठी मोठ्या निष्ठेने काम केले आहे. ते जबरदस्त वक्ता होते. मार्क्सवादी तत्वज्ञानाशी त्यांची असलेली बांधिलकी पक्की होती. त्यांनी आपले जीवन खूपच साधेपणाने व्यतीत केले. त्यांच्या निधनाने कम्युनिस्ट चळवळीचे आणि किसान आंदोलनाचे मोठे नुकसान झालेले आहे.

त्यांच्या पत्नी महाराणी कोनार, मुले आणि मुली यांच्या दु:खात पॉलिटब्यूरो अंत:करणपूर्वक सहभागी होत आहे. ☐☐☐

**(नंदुरबारमध्ये धडक मोर्चा... पान १६ वरून)**

६) वक्फच्या मालमत्तेचे संरक्षण करून त्या मालमत्तेचा वापर मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी करण्यात यावा.

७) मुस्लिम बहुसंख्य असलेल्या गावांत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्डांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि एकात्मिक बालविकास योजना राबविण्यात यावी.

८) मुस्लिम समाजातील गरिबांसाठी घरकुले उभारली जावीत.

९) हिंदू धर्माव्यतिरिक्त बौद्ध व शीख धर्मातील एस.सी./एस.टी.साठी राखीव जागा आहेत. तशाच स्वरूपाच्या मुस्लिम व ख्रिश्चन धर्मातील एस.सी. व एस.टी.करिता राखीव जागा ठेवण्यात याव्यात, त्यासाठी कायदा केला जावा, जातप्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सोपी व सुलभ करावी.

१०) केवळ संशयावरून अनेक निरपराध मुस्लिमांना वर्षानुवर्षे जेलमध्ये सडत ठेवले जाते. उदा. मालेगांव बॉम्बस्फोट प्रकरणातील खरे आरोपी सापडले तरी केवळ संशयावरून अटक केलेल्या मुस्लिमांची अनेक वर्षे सुटका केली गेली नाही. अशांची तातडीने सुटका करण्यात यावी. केवळ संशयावरून अटक केलेल्यांचा दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात यावा व निरपराध्यांची सुटका करण्यात यावी.

११) राज्य तसेच केंद्रीय सुरक्षा दलात आणि विविध शासकीय व निमशासकीय निवड समित्यांवर मुस्लिमांना पुरेसे आणि योग्य ते प्रतिनिधित्व द्या.


१२) जातीय हिंसाचार प्रतिबंधक विधेयक संमत करण्यात यावे.

१३) मौलाना आझाद महामंडळाच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची भरती करून नंदूरबार येथे आठवडाभर कार्यालय सुरू ठेवण्यात यावे. जेणे करून कर्जप्रकरणाबाबत तातडीची कार्यवाही होईल.

हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी तिन्ही समित्यांचे निमंत्रक व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या मोर्चास जिल्हाभरातून दोन ते अडीच हजार स्त्री-पुरुषांनी भागीदारी केली होती.

सदर मोर्चासाठी रुबाबसिंग ठाकरे, अनिल ठाकरे, सुनील गायकवाड, दयानंद चव्हाण, भगवान कांबळे, हमीदशहा (मामू), खंडूभाऊ सामुद्रे, सुभाष पाडवी, नरसिंग वसावे, प्रदीप मोरे, शामसिंग पाडवी यांनी परिश्रम घेऊन मोर्चा यशस्वी केला.

**– नथ्थू साळवे**




**सोलापूर प्रजा नाट्य मंडळ कलापथक महाराष्ट्रातील शाहिरांचे पोवाडे आणि क्रांतिकारी गीतांद्वारे सांस्कृतिक कार्य अखंडितपणे चालवित आहे.**

**नुकतेच त्यांनी १ ऑगस्ट २०१४ रोजी**

**लोकशाहीर कॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त**

**'जनचेतना गीतमाला' नावाची पुस्तिका प्रकाशित केली आहे.**

**देणगी मूल्य : ३० रुपयांना ही पुस्तिका उपलब्ध आहे.**

**संपर्क पत्ता : लाल बावटा कार्यालय, १७६२ दत्तनगर, सोलापूर**

**मोबाईल : अनिल वासम ९३७३५७९१८९ / प्रशांत म्याकल ९६०४२८८१८९**